# प्रेरणा Prerana

को-ऑप बँक लि. CO-OP BANK LTD.

मुख्य कार्यालय : लक्ष्मणनगर, डांगे चौक, थेरगांव, पुणे – ४११ ०३३

## * डिपॉझीटर्स एज्युकेशन अवेअरनेस फंड *

रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार बँकेकडे जमा असलेल्या रकमेवर (ठेवींसाठी मुदत संपल्यानंतर) १० वर्षापर्यंत खातेदाराने हक्क सांगितला नाही तर सदर रक्कम रिझर्व्ह बँकेकडे दरमहा पाठविण्यात येते.

१. मुदत ठेवींचे बाबतीत : मुदत संपून गेल्यावर १० वर्षानंतर

२. सेव्हिंग / करंट खात्यांचे बाबतीत : ज्या खात्यावर सलग १० वर्षे व्यवहार झालेले नाहीत अशा खात्यावरील रक्कमा

३. डी.डी./पे ऑर्डर किंवा अन्य डिपॉझीट बाबतीत डी.डी./ पे ऑर्डर किंवा अन्य डिपॉझीटचा Validity कालावधी संपल्यानंतर १० वर्षांनी

बँकेने आत्तापर्यंत ज्या खात्यांच्या रकमा रिझर्व्ह बँकेकडे पाठविल्या आहेत त्या खात्यांची यादी सोबत प्रसिद्ध केली आहे. या यादीमध्ये नाव असलेला खातेदार त्याच्या रकमेचा क्लेम बँकेकडे करु शकतो. त्यासाठी खातेदाराने पुढील बाबींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१. खातेदराने रक्कम पाठविलेले खाते त्याचे स्वत:चे आहे याची बँकेस सत्यता पटवून देणे आवश्यक आहे त्यासाठी

   अ) खातेदाराची/संस्थेची KYC ची कागदपत्रे दाखल करावीत (फोटोसह)

   ब) खात्यासंदर्भातील उपलब्ध असल्यास जुने पासबुक/खाते उतारा/चेक पुस्तक किंवा अन्य पुरावा सादर करावा.

   क) खाते उघडण्याच्या फॉर्मवरील माहिती व सही आपलीच आहे याची खात्री करुन द्यावी.

२. सोबतचा फॉर्म भरुन द्यावा व त्यासोबतची कागदपत्रे आपल्या जवळच्या शाखेत किंवा मुख्य कार्यालयात सादर करावा.

३. क्लेम आल्यानंतर त्याची खात्री करुन व मंजुरी घेऊन रिझर्व्ह बँकेकडे वर्ग केलेली रक्कम व नियमानुसार त्यावरील व्याज पात्र खातेधारकास अदा केले जाईल.